# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे

## मराठी विषयाचा पुनर्रचित अभ्यासक्रम- जून २०२० पासून

## M. A. भाग –२

## Choice Based Credit System [CBCS]

### निवड आधारित श्रेयांक पद्धत

SNJB's K.K.H.A.Arts S.M.G.L.Com. & S.P.H.J. Science College CHANDWAD (NASHIK)

## M. A. मराठी भाग - २ : अभ्यासपत्रिकांची नावे आणि संकेतांक :

| सत्र | संकेतांक | Core Courses (CC) (मुख्य अभ्यासपत्रिका) | Credit (श्रेयांक) | संकेतांक | Choice Based Optional Paper (वैकल्पिक अभ्यासपत्रिका) | Credit (श्रेयांक) | Total Credit |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 3 | CC -9 | प्रसारमाध्यमांसाठी लेखनकौशल्ये : भाग १ | 4 | CBOP - 12 | लोकसाहित्याची मूलतत्त्वे आणि मराठी लोकसाहित्य : भाग १ | 4 | 16 |
| | CC-10 | साहित्य समीक्षा | 4 | | सौंदर्यशास्त्र : भाग १ | | |
| | CC - 11 | नेमलेल्या मध्ययुगीन साहित्यकृतींचा अभ्यास : भाग १ | 4 | | लेखनविद्या आणि निबंध लेखन : भाग १ | | |
| | | किंवा | | | मराठीतील वैचारिक साहित्य | | |
| | | नेमलेल्या अर्वाचीन साहित्यकृतींचा अभ्यास : भाग १ | | | साहित्य : सर्जन व उपयोजन : भाग १ | | |
| | | | | | | | |
| 4 | CC - 13 | प्रसारमाध्यमांसाठी लेखनकौशल्ये : भाग २ | 4 | CBOP -16 | लोकसाहित्याची मूलतत्त्वे आणि मराठी लोकसाहित्य : भाग २ | 4 | 16 |
| | CC - 14 | साहित्य संशोधन | 4 | | सौंदर्यशास्त्र | | |
| | CC- 15 | नेमलेल्या मध्ययुगीन साहित्यकृतींचा अभ्यास : भाग २ | 4 | | लेखनविद्या आणि निबंध लेखन : भाग २ | | |
| | | किंवा | | | साहित्याचा सामाजिक दृष्टीने अभ्यास | | |
| | | नेमलेल्या अर्वाचीन साहित्यकृतींचा अभ्यास : भाग २ | | | साहित्य : सर्जन व उपयोजन : भाग २ | | |
| | | | **24** | | | **08** | **32** |

K.K.H.A.Arts, S.M.G.L.Com. & S.P.H.J. Science College
CHANDWAD (NASHIK)

## M. A. मराठी भाग - २ : प्रश्नपत्रिकेचे स्वरूप

| प्रश्नपत्रिका आराखडा | | |
|---|---|---|
| वेळ : ३ तास | सत्रांत परीक्षा | गुण : ५० |
| १ | दीर्घोत्तरी प्रश्न दोन पैकी एक | १० |
| २ | दीर्घोत्तरी प्रश्न दोन पैकी एक | १० |
| ३ | दीर्घोत्तरी प्रश्न दोन पैकी एक | १० |
| ४ | दीर्घोत्तरी प्रश्न दोन पैकी एक | १० |
| ५ | टिपा लिहा चार पैकी दोन | १० |
| | एकूण | ५० |
| सूचना : प्रश्नपत्रिका ही अभ्यासक्रमाच्या सर्व घटकांना समान न्याय देणारी आणि अभ्यासक्रमाच्या उद्दिष्टांशी सुसंगत असावी. | | |
| | अंतर्गत मूल्यमापन | |
| १. | लेखी चाचणी / मध्यकालीन चाचणी ( एक घ्यावी.) | २० |
| २. | शोध निबंध / प्रकल्पलेखन | २० |
| ३. | ग्रंथालयीन कार्य | ५ |
| ४. | सादरीकरण / मौखिक परीक्षा | १० |
| ५. | लघू प्रश्नमंजुषा | ५ |
| ६. | गृहपाठ | ५ |
| ७. | विस्तार कार्य | १० |
| ८. | संशोधन प्रकल्प / खुले पुस्तक परीक्षा | १० |
| अंतर्गत मूल्यमापनासाठी वरीलपैकी पर्याय निवडावे. त्यांचे एकूण गुण पन्नास असावे. | | ५० |

PRINCIPAL
K.R.T.A. Arts, B.H.Com. Comm. Science College, Chandwad Dist. Nashik.




PAGE
DATE

मोरे रोहिणी नामदेव
Rool No-2
MA-I Mar

# अनुक्रमणिका

| अ.क्र | अंतर्गत मूल्यमापन | गुण |
|---|---|---|
| 1) | लेखी परीक्षा - I | १५/ |
| 2) | लेखी परीक्षा - II | १२/ |
| 3) | सादरीकरण | ०६/ |
| 4) | गृहपाठ | ०३/ |
| 5) | खुली पुस्तक परीक्षा | ०६/ |

Chandr...

(प्रा. डॉ. कुमार [illegible])

मराठी विभाग प्रमुख

cello

Disney · PIXAR Cars


©Disney/Pixar

See you at the Finish Line

PAGE
DATE



मेरा परिचय



cello
Disney · PIXAR
Cars
©Disney/Pixar

Q 1

1) मराठी भाषा विकासाचे कालिक टप्पे सांगा.

भाषा ही एक सामाजिक संस्था आहे. तिचे अस्तित्व समाजजीवनावर अवलंबून असणे स्वाभाविक आहे. ज्या प्रमाणात समाजजीवन प्रवाही असते त्या प्रमाणात भाषेलाही प्रवाहीपण राखावे लागते. अन्यथा बदलत्या समाजजीवनाला व्यक्त रूप देण्याचे तिचे सामर्थ्य खुंटते आणि ती निरस पावते. यासाठी अखंड परिवर्तनशील प्रवृत्तीच्या समाजजीवनाचे प्रतिबिंब आपल्यात उमटविण्यासाठी तिला सतत प्रयत्नशील राहावे लागते आणि म्हणून तिला सतत बदलावे लागते. बदलणे हे भाषेच्या जिवंतपणाचे लक्षण ठरते.

कोणत्याही प्रवाही भाषेत लवचीकता आणि परिवर्तनशीलता असते म्हणून तिच्यात नियमबद्धता असूनही परिवर्तन घडून येते. क) उच्चार प्रक्रियेत बदल घडून येणे. ख) जुनी रूपे जाऊन नवी रूपे येणे

ग) जुने संकेत जाऊन नवीन संकेत निर्माण होणे किंवा जुन्या संकेतांना नवे अर्थ प्राप्त करून देणे इ. अनेक अंगांनी भाषा बदलत असते. अर्थात हा बदल अत्यंत सूक्ष्म असल्यामुळे त्याचे स्वरूप तत्काळ आकलन होत नाही. प्रदीर्घ काळानंतर हा बदल आकलनात येतो. एका पिढीला त्या भाषेचे स्वरूप दुसऱ्या पिढीला जाताना त्यात निश्चितपणे बदल होतो; परंतु हा बदल चार-पाच पिढ्या गेल्यानंतर जाणिवेच्या कक्षेत येतो. सामाजिक व्यवहारात भाषेचे हे परिवर्तन अपरिहार्य ठरते. यामध्ये माणसाच्या सवयी, आळस, वागिंद्रियातील दोष, ध्वनी उच्चारणातील काटकसर इ. गोष्टी भाषा परिवर्तनाला कारणीभूत असतात.

भाषा एका पिढीतून दुसऱ्या पिढीकडे जात असताना होणारे अनुकरण सर्वच बाबतीत काटेकोरपणे पूर्ण असते असे नाही तर काही बाबतीत अत्यंत सूक्ष्म अपूर्णता ही राहतेच. या अपूर्णतेमुळेच काही काळानंतर भाषेचे पूर्व रूप लोपत जाऊन त्या जागी दुसरे भाषिक रूप उदयास येते.

आतापर्यंत सांगितलेल्या कारणांनी भाषेत होणाऱ्या बदलाचे स्वरूप अत्यंत सूक्ष्म आणि सौम्य असते; परंतु राज्यक्रांती, धर्मक्रांती व समाजक्रांती या कारणांमुळे होणाऱ्या बदलाचे स्वरूप मात्र झपाट्याने नजरेस येण्याइतके परिणामी असते. विशेषतः राज्यक्रांतींनी भाषेच्या जीवनावर परिणाम घडून

मराठीच्या आजवरच्या आयुष्यात जे बदल घडून आले त्यांना राज्यक्रांती प्रामुख्याने कारण ठरलेली असल्यामुळे तिच्या जन्मापासून वर्तमानकालीन स्थितीपर्यंत राजकीयदृष्ट्या जे कालखंड पडतात त्यांना त्या काळाच्या राजवटी-वरून नावे दिलेली आहेत.

यानंतरचा इ. स. 1600 - 1700 या शंभर वर्षांच्या कालखंडात महाराष्ट्रात स्वातंत्र्याचे वारे वाहत्यामुळे स्वातंत्र्यबरोबरच स्वभाषेचा अभिमान वाढू लागला परिणामत: बहामनीकालीन मराठीचे स्वरूप अल्प का होईना पालटले गेले म्हणून या शंभर वर्षांच्या कालखंडास 'शिवकालीन मराठी' असे म्हटले जाते.

भाषा ही सतत बदलत असते. भाषिक परिवर्तन हे दोन मुद्यांवर आधारलेले असते 1) काळ. व 2) संरचना भाषेची संरचना ही काळाच्या मुद्यावरील नाते ठेवून समांतर असते म्हणून भाषिक परिवर्तन पाहत असताना भाषेचे कालिक भेद मानून आपण विभागणी करतो.

## मराठीच्या भाषाविकासाचे टप्पे :-

मराठीचा भाषिक अभ्यास करताना आजपर्यंत महाराष्ट्राच्या राजकीय परिवर्तनाची जुळणारी कालखंडानुसार विभागणी करता येत नाही. उदा. यादवकालीन, बहामनीकालीन, पेशवेकालीन, आंग्लकालीन मराठी.

परंतु हे वर्गीकरण करणे अयोग्य आहे. याचे कारण भाषिक परिवर्तनाला राजकीय स्थिती किंवा स्थित्यंतर हे एक कारण झाले असले तरी ते एकमेव नसते. तसेच प्रत्येक राजकीय अमदानीतील मराठी भाषिकदृष्ट्या भिन्न असलेच असे नाही. त्यामुळे राजकीय, सामाजिक, वैचारिक इ. कारणांनी किंवा भाषेच्या अंगभूत प्रवृत्ती म्हणूनही जे भाषिक परिवर्तन मराठीच्या बाबतीत झाले आहे. त्यानुसार मराठीचे रूप ज्या कालखंडामध्ये आपल्याला अगदी स्पष्टपणे बदललेले दिसेल असेच तिचे कालिक भेद मानले पाहिजेत.

मराठीचे तीन कालिक भेद आहेत

मराठीचा आदिकाल : मराठीचा उत्पत्तिकाल ते इ. स. 12[illegible]

तत्कालीन हस्तलिखितांच्या या कालखंडातील मराठीच्या भाषिक अध्ययनाच्या दृष्टीने अनमोल असा ठेवा आहे या काळातील अभंग इत्यादी वाङ्मय मौखिक परंपरेमध्ये टिकून आहे. त्यामुळे त्यात पाठभेदांना प्रचंड वाव आहे. म्हणजे मराठी भाषेचा उगमकाळ व यादव घराण्याचा अखेर या दोन मर्यादा या कालखंडाच्या म्हणून सांगता येतात.

2) मराठीचा मध्यकाल-(इ.स 1350 ते इ.स 1850):-

या कालखंडातील पहिली 50 वर्षे ही संक्रमणावस्थेची आहेत. या कालखंडात मुसलमानी राजवटीमुळे मराठी भाषेचा अरबी फारसीशी दृढ व निकटचा संबंध दीर्घकाळ आला. अरबी- फारसी भाषांचा प्रभाव कमी व्हावा म्हणून जाणुनबुजुन मराठीचे संस्कृतीकरण करण्याचा राजकीय प्रयत्न झाला तर पंडित कवीकडून आपल्या पांडित्य प्रदर्शनासाठी संस्कृत प्रचुर काव्यरचना केल्या गेल्या. युरोपिन मिशनऱ्यांनी धर्मप्रसाराच्या निमित्ताने जी मराठी ग्रंथरचना केली. तिच्यातून मराठीचे नवेच भाषिक रूप दिसून येते. अशा प्रकार ६ व्या शतकाच्या प्रभावातून मराठीमध्ये इतके भाषिक परिवर्तन झाले आहे. कालिक भेद करताना 'मध्यकाल' हा नवा कालखंड येथपासून मानव लागतो.

3) मराठीचा अर्वाचीन काल इ.स 1850 नंतर:-

इ.स 1818 साली पेशवाईचा अस्त होऊन महाराष्ट्र इंग्रजी राजवट सुरु झाली. या परिवर्तनाचा महाराष्ट्रीयनांच्या जीवनावर फार मोठा परिणाम घडून आला पेशवाईचा मराठीवर फारसी पकड चांगलीच बसली होती. पेशवाईचा अस्त झाल्यावर लगेच या परिस्थितीत बदल झाला असे नाही. सन 1850 पर्यंत महाराष्ट्रीय जीवन संथ होते. जेत्या-च्या इंग्रजी भाषेचा मराठीशी खऱ्या अर्थाने 1850 नंतर संपर्क आला. जीला आपण अर्वाचीन मराठी म्हणतो तिची भाषिक अवस्था इ.स. 1800 च्या सुमारास प्राप्त झाली.

समारोप :-

अशाप्रकारे मराठी भाषाविकासाचे आदि-मध्य-अर्वाचीन असे तीन भेद आहे. भाषाशास्त्रीय परिवर्तनाचे तत्त्व मराठीच्या कालिक भेदाच्या वर्गीकरणासाठी उपयोगात आणले आहे.

2

3) ध्वन परिवर्तन संकल्पना स्पष्ट करा.

→ भाषा ही संरचना असते त्या-त्या भाषेतील विशिष्ट ध्वनि मध्ये परिवर्तन घडून आल्यास ध्वनिपरिवर्तनास दिशा प्राप्त होते. 'Phonetic laws are ecfalse. they have no exceptions' असे एक विद्वान लेनर्ड ब्लूमफील्ड याने आपल्या ग्रंथात केले आहे. म्हणजेच भाषेच्या इतिहासात जी ध्वनि परिवर्तने घडून येतात. ती नियमानुसार असतात, त्यांना अपवाद नसतात असे त्यांचे मत आहे. मात्र भाषिकाची व्युत्पत्तीकरणाची प्रवृत्ती पाहता तसेच त्यांनी केलेले नियमोल्लंघन पाहता अपवाद आहेत किंवा असतात असे निदर्शनास येते. म्हणूनच भाषाभ्यास ध्वनिपरिवर्तनाचा अभ्यास करणे अपरिहार्य ठरते.

ध्वन परिवर्तन :-

अ) अर्थ :- भाषा ही संरचना असते. त्या संरचनेच्या बाह्य व आंतरिक अशा दोन पातळ्या असतात. त्यापैकी पहिली पातळी पदिमार्थ असणाऱ्या ध्वनिन संघटनेची असते. तर दुसरी पातळी शब्द व वाक्य यांच्या संघटनेच्या संरचनेची असते. भाषिक परिवर्तनातील या दोन्ही पातळ्या म्हणजेच ध्वन व अर्थ भाषेच्या आंतरिक संरचनेला धक्का लावीत नाही. मात्र काही कारणास्तव भाषेच्या आंतरिक संरचनेला धक्का लागतो व ती कोलमडून पडते. त्यामुळे एक भाषा मृत होते व तिच्या भाषाद्रव्यातून अंगातून दुसरी भाषा निर्माण होते. मात्र 'व्यक्ती तितक्या प्रवृत्ती' हे विधान भाषेच्या बाबतीत सत्य ठरते. विशिष्ट काळी विशिष्ट प्रदेशात बोलल्या जाणाऱ्या भाषेत बदल दिसून येतात. यांचाच अर्थ भाषेत ध्वनिपरिवर्तन घडून येते.

ब) व्याख्या :- "

" एका विशिष्ट काळी, एका विशिष्ट प्रदेशात बोलल्या जाणाऱ्या एका विशिष्ट समाजाच्या भाषेतील ध्वन अथवा ध्वनी कालांतराने बदलतात त्यालाच ध्वनिपरिवर्तन अथवा ध्वनपरिवर्तन असे म्हणतात.

क) ध्वनिपरिवर्तनाचे विशेष :-

वरील विवेचनावरून आणि व्याख्येवरून ध्वनिपरिवर्तनाचे अथवा ध्वनपरिवर्तनाचे काही विशेष स्पष्ट होतात. ध्वनिपरिवर्तनाचे किंवा ध्वनपरिवर्तनाचे विशेष पुढीलप्रमाणे सांगता येतील.

1) निरपवाद :-
स्वननियम किंवा ध्वनिनियम हे नियमित असतात एवढेच नव्हे तर निरपवाद असतात, हा मुद्दा व्हेनर या भाषाशास्त्रज्ञाने मांडला आहे. म्हणजेच भाषेतील विशिष्ट ध्वनीमध्येच परिवर्तन होते असे नाही. तर कोणत्याही ध्वनीमध्ये परिवर्तन होऊ शकते. त्यामुळे कोणताही ध्वनी अथवा स्वन ध्वनिपरिवर्तनास अपवाद नसतो. म्हणजेच ध्वनिपरिवर्तन हे निरपवाद असते.

2) नियमित :-
एखाद्या भाषेत आदयस्थानी येणारा क, ह स्वन इत्यादी होण्याची परिवर्तन वृत्ती असेल तर सर्व शब्द व व्याकरणिक रूपांमध्ये तो त्या विशिष्ट स्थानी त्याच परिवर्तित झालेला दिसतो उदा॰ मध्यवर्ती मराठीतील ओकळ्या, काका, पिवळा हे शब्द अहिराणी -ला वयख्या। काया। पिवया असे बदलतात. विशिष्ट स्वनातील विकृती व परिवर्तन हे इतके नियत व नियमित असते की ते त्या विशिष्ट परिस्थितीत काळात भाषेतील तरतऱ्या सर्व स्वनांना निरपवाद लागू होतात त्यामुळे स्वनपरिवर्तन हे निरपवाद व नियमित असते हे स्पष्ट होते.

3) अव्यतिक्रमणीयता :-
एखाद्या भाषेत एकदा का स्वन किंवा ध्वनिपरिवर्तन सुरू झाले की ते थोपविणे अशक्य असते. भाषा ही अनेक शतकांपासून प्रचलित असते. असंख्य भाषिक अनेक पद्धतीने भाषेचा उपयोग करीत असतात. बोलली जाते ती भाषा या अर्थाने भाषेतील उच्चार अमर्याद असतात. म्हणूनच ध्वनिपरिवर्तन हे अमर्याद तसेच अव्यतिक्रमणीय असते. ध्वनिपरिवर्तनाचे हे परिणाम भाषेत व व्याकरणात दूरवर पसरतात. भाषाशुद्धीसारख्या चळवळीने देखील ते थांबविणे अशक्य असते. त्यामुळे ध्वनिपरिवर्तन हे निरविध्यासारखे म्हणजेच अव्यतिक्रमणीय ठरते.

4) अज्ञेय :-
भाषेच्या स्वपरिवर्तनाचे म्हणजेच ध्वनिपरिवर्तनाचे स्वरूप व भविष्यकाळात कसे राहील याविषयी कोणतीही शक्यता

वर्तविता येत नाही. भविष्यकाळात एखादया भाषेतील ध्वनीचे रूप कसे असेल याचे पूर्वानुमान करता येत नाही. त्यामुळे ध्वनिपरिवर्तन हे अज्ञेय आहे असे निदर्शनास येते. एखादया भाषेतील ध्वनिपरिवर्तनाबाबत किंवा ध्वनीच्या रूपातील परिवर्तबाबत निश्चित पूर्वानुमान मांडता येत नसल्यामुळे अज्ञेयता हे ध्वनिपरिवर्तनाचे विशेष ठरते.

5) सार्वत्रिकता (सार्वत्रिक ध्वनिपरिवर्तन)

ध्वनिपरिवर्तन हे नकळत, मंदगतीने, क्रमानुक्रमाने होत असते उदा. 'ए' या ध्वनीचे परिवर्तन इ या ध्वनीपर्यंत येण्यात अनेक शतके लागतील. ध्वनपरिवर्तनाचा भाषेच्या व्याकरणावर अर्थ-व्यवस्थेवर कोणताही परिणाम होत नाही. क्रमयुक्तेचा प्रारंभ एखादया शब्दापुरता सुरू होतो आणि नंतर तो सर्वत्र पसरतो. उदा. 'हस्त' चे 'हात' व 'कर्ण' चे 'कान' याच तऱ्हेने झाले आहे. क्रमयुक्तता ही परिस्थितीसापेक्ष व व्यक्तिसमूलक असते. अनुकरणाने ती एका व्यक्तिकडून दुसऱ्या व्यक्तिकडे प्रसारित होते. म्हणूनच ध्वनिपरिवर्तन हे सार्वत्रिक असल्याचे दिसून येते.

समारोप :

अशा प्रकारे निरपवाद, नियमित, अज्ञेय, अव्यतिक्रमणीय आणि सार्वत्रिक हे ध्वनिपरिवर्तनाचे महत्त्वपूर्ण विशेष असल्याचे वरील विवेचनावरून स्पष्ट होते. सर विल्यम जोन्स याने इ.स. 1786 मध्ये कलकत्याच्या रॉयल एशियाटिक सोसायटीच्या सभेपुढे केलेले संस्कृत, लॅटिन आणि ग्रीक इ. युरोपिय भाषांतील साम्य दर्शविणाऱ्या व्याख्यानात ध्वनि-परिवर्तनाचे वरील विशेष स्पष्ट होतात. भाषेचा समग्र विचार करण्यासाठी ध्वनिपरिवर्तनाचे विशेष लक्षात घेणे आवश्यक ठरते.

see you at the FINISH LINE

PAGE

DATE



cello

Disney · PIXAR Cars

©Disney/Pixar

Date : / /

भाषेच्या अभ्यासाचे महत्त्व सांगून भाषा ही एक सामाजिक संस्था आहे हे स्पष्ट करा.

-> आपला भारत देश भाषेच्या अभ्यासाबद्दल प्राचीन काळापासून प्रसिद्ध आहे. वेदवाङ्मय म्हणजे जगातील पवित्र वाङ्मय व अत्यंत प्राचीन वाङ्मय वेदाची भाषा ही अर्थातच प्राचीन भाषांपैकी एक. तेव्हा वेदांच्या अभ्यासासाठी त्यांच्या भाषेचा अभ्यास ओघाने करावाच लागतो. वेदवाङ्मयाच्या संहितेचे संरक्षण प्राचीन काळापासून ते आज मोठ्या निष्ठेने व आस्थेने केले गेले आहे. त्या प्राचीन वाङ्मयात एका अक्षराचीही फरक झाला नाही आणि ही भाषा लिपी किंवा लेखन व कला अवगत नसताना झाली आहे.

तात्पर्य, वैदिक वाङ्मय हे खरे वाङ्मय होय व ते वाणी द्वारा आजवर एका पिढीने दुसऱ्या पिढीस संक्रमित केले आहे. हे असे कित्येक वर्षे चालत आहे.

क) हावभावांची भाषा

1) मान हलवून 'हो की नाही' हे अगदी लहान मुलालाही ज्ञान असते. 2) तोंडाने चक असा आवाज म्हणजे नाही हे मुलांना सहज कळते. 3) पत्ते खेळताना डोळे मिचकावणे म्हणजे किस्मावर. 4) जिभेचा शेंडा दाखविला म्हणजे लाल बदाम.

तथापि इत्यादी गुणांमध्ये या सर्व भाषा आहेत, हे मात्र त्या वयात माहिती नसते.

भाषा म्हणजे एकाच भाषेतील अभिप्रेय अर्थ दुसऱ्यात कळावा या मूलभूत मानवी गरजेतून सर्व भाषा तयार झाल्या स्व-संरक्षण व स्व-वंश संवर्धन यामुळे गरजांतून इतर मानवाशी संवाद ही दुसऱ्या पायरीची गरज निर्माण होते या गरजपूर्तीचे साधन म्हणजे भाषा.

'भाषा' शब्दाचा बहुविदार्थ काढता येतो.

उदा० कालिदासाची भाषा मोठी प्रासादिक आहे. या वाक्यात कालिदासाचे लेखन असा अर्थ अभिप्रेत आहे.

'तुझी भाषा मला समजू शकत नाही' या ठिकाणी समोरच्या व्यक्तीच्या मनातील हेतू असा अर्थ होतो.

'काय त्याची भाषा, त्याच्या तोंडी नेहमी अपशब्दच असतात' असे सुचवायचे असते. एकूण कवींची भाषा, विद्वज्जनांची

भाषा, ग्रामीण भाषा अशा कितीतरी प्रकारची भाषा या शब्दाचा प्रयोग आपण करीत असतो. जशी लेखकाची तशी चित्रकाराचीही भाषा असू शकते.

"भाषा" हा शब्द 'भ' या नामवाचक आणि क्रिया-दर्शकापासून आलेला आहे. त्याचा मूळ अर्थ 'बोलणे' आवाज उत्पन्न करणे असा आहे. इंग्रजी कोषात 'भाषा' या शब्दासाठी Language या शब्दाचे मूळ Latin शब्द Langua हे आहे Langua म्हणजे Speech कोशवाङ्मयात 'भाषा' या शब्दाचा मानवी मुखातून निघालेली 'सार्थ ध्वनिसंहिता' असा अर्थ दिला आहे. भाषा म्हणजे व्यवहारास प्रवृत्त करणाऱ्या सार्थ व अन्य ध्वनीचा समूह'. भाषेत शब्द असतात शब्द हे ध्वनींचे बनलेले असतात. ध्वनींना विशिष्ट अर्थ असतो. ते ध्वनी काही विशिष्ट नियमांनी एकमेकांना जोडलेले असतात.

आत्मप्रकटीकरण (Self Expression) व आत्मनिवेदन (Self Communication) या दोन गोष्टी भाषेच्या मूळाशी असतात. 'भाषा म्हणजे ध्वनियुक्त माध्यम' अशी व्याख्या केल्यास ही व्याख्या मानवी व्यवहारास तसेच मानवेतर प्राण्यांच्या बाबतीतही लागू होते.

अ) हावभावाची भाषा :- (Gesture Language)

ध्वनियुक्त भाषेची निर्मितीच्या पूर्वीची ही एक अवस्था मानलेली आहे. आद्यमानवाने या भाषेचा वापर केला उदा. डोळे मिचकावून गप्प राहा, बोलू नको असा अर्थ भुवया उंच करणे, हाताने इकडे ये तिकडे जा, होकारार्थी नकारार्थी, मान हलविणे, हवे नको ते मानेने दर्शविणे इत्यादी. डोळ्यांची भाषा, बोलकी भाषा, प्रेमाची भाषा, आतुरता व उत्कंठा इत्यादी भाव व्यक्त करतात.

डोळे शृंगार बोलतात. भाषेने ध्वनी हे माध्यम का स्वीकारले? दुसरे का नाही, अशी कोणती गुणवैशिष्ट्ये त्यात आहेत?

1) उजेड असतो, अंधार असतो, दोन्ही वेळा सारख्याच प्रति ध्वनींचा गुण ध्वनित आहे.

2) ध्वनी उत्पन्न झाल्याबरोबर चोहोबाजूस पसरतो.

म्हणून ध्वनी हे माध्यम मानवप्राण्याला आत्मनिवेदनासाठी उपयुक्त व सोईचे वाटले. त्याच माध्यमाचा विकास आज ही भाषेत झाला.

३) मानवप्राण्यामध्ये ध्वनी निर्माण करण्याची सहज प्रवृत्ती दिसून येते. त्यासाठी त्याला कोणताही खर्च येत नाही.

ग] मानवेतर प्राण्यांची भाषा :-

मानवेतर प्राण्यांच्या ध्वनीलाही एक अर्थ असतो. कुत्रा मांजर इ. आरडन हा एक प्रकार आहे. आरडन हा सूर आनंद व दुःख प्रकटविणे इत्यादी प्रत्येक बाबतीत त्यांना ध्वनी केवळ. उदा० कुत्र्याचे भुंकणे, मांजराचे गुरगुरणे, हत्तीचा चित्कार कोकिळेचा कुहूकुहू हा स्वर इ. तसेच भीतीमुळे होणारा भावना संज्ञापनाचे अतिशय भावना प्रकट करण्यापलीकडे त्यांची मजल जाऊ शकत नाही. अशा प्रकारे त्यांची एक स्वतंत्र भाषा आहे. त्यांच्या शब्दांची व्याख्या 'व्यवहारात प्रवृत्त करणारा ध्वनी' अशी करता येईल. माकड हा पुढारलेला प्राणी आहे. त्याला ध्वनी विदित आहेत. भय, धोका, संकट प्रतीत करताना तो कर्कश ध्वनी काढतो ध्वनीच्या समूहाना भाषा म्हणता येईल अर्थात, यापुढे भाषेची सर्व कमाई मानवाचीच आहे. त्याने ध्वनी निर्माण करून त्याला अर्थ चिकटवून योजावर्य साधून भाषा निर्माण केली. त्यामुळे भाषा ही ईश्वरी देणगी नसून नाही भाषेमध्ये ईश्वरी कर्तृत्व केवळ ध्वनी निर्मितीपुरतेच आहे. ध्वनीनंतरची भाषेची सर्व उभारणी हे मानवी कर्तृत्व आहे. म्हणून भाषा ही अर्जित आहे.

भाषा ही संवाद साधते, दोन व्यक्तींना समूहाला जोडणारे भाषा हे एक प्रभावी माध्यम आहे. अनुभवाचे अथवा ज्ञानाचे स्थानांतर अथवा कालांतर हे भाषेचे कार्य अनादी काळापासून सुरू आहे.

उदा. एका व्यक्तीचा अनुभव दुसऱ्याला, एका काळाचा अनुभव दुसऱ्या काळापर्यंत पोहोचला पाहिजे. शास्त्रीय शोधांनी भाषेत विविधता आणली व भाषेची क्षमताही वाढली.

भाषा ही एक सर्वश्रेष्ठ सामाजिक संस्था आहे.

ज्या समाजात वावरायचे त्या समाजाच्या संस्था

यशस्वीपणे व आत्मविश्वासाने वावरता येईल आपली भाषा आत्मसात केल्याशिवाय आपल्या स्वत:चा समाजही आपल्याला चांगल्या प्रकारे कळू शकणार नाही.
उदा. काय करून राहिले भाऊ? असे विचारल्यास खानदेशात प्रेमाचे उत्तर मिळेल. खरे म्हणजे भाषा ही एक सामाजिक संस्था आहे असे म्हणता येईल. सामाजिक स्तरानुसार भाषेतदेखील बदल घडून आलेले दिसून येतील.

भाषाभ्यासाचे महत्व :-

भाषा ही दैनंदिन व्यवहारात प्रत्येकास अनिवार्य म्हणजे ती वापरावीच लागते. तिला एक उपयुक्तता मूल्य निश्चि-तच आहे. किंबहुना, मानवी जीवनातील प्रत्येक क्षेत्रात भाषेचा उपयोग आढळतो त्यामुळे भाषेचा अभ्यास सा-माजिक व सांस्कृतिक अंगानेही करणे क्रमप्राप्त ठरते. समाज आणि संस्कृतीच्या अध्ययनासाठी ही भाषाशास्त्र मदत करते. समाजाच्या आध्यात्मिक विका-साचे प्रतिबिंब भाषेमध्ये पडत असते. मनुष्य हा समूह प्रिय प्राणी आहे. सहयोग आणि सहकार्याच्या तत्वावर मानवा-मानवाचा समूह तयार झाला. समाज अस्तित्वा-त आला या अर्थाने भाषा ही एक सामाजिक संस्था ठरते. राजकीय, आर्थिक, औद्योगिक निर्णय व धोरणे या क्षेत्रातही भाषेचा अतूट संबंध येतो.
उदा. भाषावार प्रांतरचना, त्रिभाषा सूत्र ही त्यांचीच रूपे होय. तसेच भाषिक बिघाडाचे योग्य निदान व उपचार या दृष्टीने महत्त्वाचे का ठरते याची भाषाविज्ञानाला जाण आहे. त्यातूनच भाषा शिक्षण आवश्यक का आहे आणि त्याचबरोबर भाषिक सुधारणेही विश्लेषण व महत्व सहज लक्षात येते.



cello

Disney Pixar Cars

©Disney/Pixar

Karmveer K. H. Abad Arts, Shriman M. G. Lodha Commerce
& Shriman P. H. Jain Science College,
Neminagar, Chandwad Dist. Nashik

ESTD - 1928

Seat No. (in figures) 2

Jr. Supervisor's Signature & Date

Seat No. (in words) TWO

Class M.A-I Marathi Division ______ No.: 14778

Subject ______ Paper 3 Supplement No. ______

(Please start writing here. Write on both sides)

भाषा म्हणजे काय? ते सांगून भाषा अभ्यासाच्या पद्धती स्पष्ट करा.

→ मानवी जीवनात भाषेला खूप महत्व असते. अन्न वस्त्र व निवारा या त्याच्या मूलभूत गरजांप्रमाणेच भाषा ही सुद्धा त्याची मूलभूत गरज आहे. असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. मानवाच्या सर्व प्रकारच्या सामाजिक आणि सांस्कृतिक परंपरांचे संवर्धन आणि संक्रमण भाषेच्या माध्यमातून होत असते. मानवाच्या भावभावनांच्या आणि विचारांच्या अभिव्यक्तीचे भाषा हे प्रमुख माध्यम आहे. भाषेच्या स्वरूपाचा शास्त्रशुद्ध अभ्यास करणे भाषाविज्ञानात अपरिहार्य ठरते. त्यामुळेच भाषा म्हणजे काय? तिचे अभ्यासाच्या पद्धती कशा आहे? तिची प्रमुख पद्धती कोणत्या आहेत यांचाही अभ्यास करणे भाषा अभ्यासकांना आवश्यक ठरते.

अ] भाषेचा अर्थ :-

भाषेची सर्वसमावेशक अशी व्याख्या करणे अवघड आहे. 'भाषा बोलणारा तो माणूस' अशी माणसाची व्याख्या केली जाते. प्रस्तुत ठिकाणी आपणास मानवाच्या भाषेचा विचार करावयाचा आहे. प्रारंभीच्या काळात मानवाने हावभावांची भाषा, नेत्रपल्लवी किंवा करपल्लवी यांचा आपल्या मनातील विचार व भावना यांच्या अभिव्यक्तीसाठी उपयोग केल्याचे आढळते. पण नंतर मानवी प्रगतीबरोबरच ध्वनियुक्त भाषेचीही निर्मिती झाली. मानवाशी

ब] व्याख्या :-

भाषेची नेमकी व्याख्या करणे अशक्य आहे. तरीही भाषेचे स्वरूप स्पष्ट करणाऱ्या काही व्याख्या भाषाभ्यासकांनी मांडल्या आहेत. त्या पुढीलप्रमाणे.

1) ना. गो. कालेलकर :-

" मूळ आशयाशी कार्यकारण संबंध नसलेल्या ध्वनी संकेतांनी बनलेली व समाजव्यवहाराला साहाय्यभूत अशी भाषा ही एक पद्धत आहे.

2) श्री. न. गजेंद्रगडकर.

" यादृच्छिक ध्वनी संकेतांवर आधारलेली व समाजव्यवहाराला साहाय्यभूत ठरणारी अशी पद्धत म्हणजे भाषा

क] व्याख्यांचा अर्थ :-

वरील व्याख्यांचा विचार करता भाषा ही संकेतप्रणालीवर आधारलेली, अर्थपूर्ण ध्वनीद्वारे बनलेली व मानवी मुखाद्वारे उच्चारली जाणारी असते असे म्हणता येईल. या भाषेद्वारेच मानवाची प्रगती घडून आलेली दिसते. भाषा ही मानवाच्या विचार, भावना व अनुभूती यांच्या आविष्काराचे प्रमुख साधन असते. भाषा ही एक सामाजिक संकेतप्रणाली असते. एकूणच भाषेविषयी असे स्थूलमानाने म्हणता येईल की, 'मानवाच्या विचार, विकार, भावना व अनुभूतींवर आविष्करणाची, विशिष्ट संकेतांवर आधारलेली तसेच त्याच्या विकासास पूरक ठरणारी व्यवस्था किंवा पद्धती म्हणजे भाषा होय.' दैनंदिन जीवनात व व्यवहारात परस्परांशी संवाद साधण्यासाठी मानवास भाषा उपयुक्त ठरते.

* भाषा अभ्यासाच्या विविध पद्धती.

1) ऐतिहासिक भाषाभ्यास पद्धती. या पद्धतीत वेगवेगळ्या कालातील भाषेच्या स्वरूपाचा विचार केला जातो. भाषा ही सतत बदलत जाणारी संस्था आहे. शब्द, शब्दार्थ, वाक्यरचना इ. भाषिक घटकांत एकसारखे बदल होत असतात. उदा. आर्यांची एक मूळ बोलीभाषा होती. ते ती त्यांच्या मूळ वस्तीस्थानात बोलत असत. कालांतराने त्यात बदल झाले व त्यापासून वैदिक, ग्रीक, लॅटिन इ.

अभ्यासातील व त्यापासूनच अर्वाचीन मराठी इत्यादी उत्पन्न झाल्या व त्याचे पोटभेद निर्माण झाले.

वरील पद्धतीने होणारे भाषेतील बदल नोंदवून ठेवून त्या बदलांचे वर्गीकरण कालक्रमानुसार केले जाते. त्या बदलांचे ऐतिहासिक विवेचन करून त्यांची तुलना केली जाते. एका भाषेच्या या अभ्यासाच्या पद्धतीस 'ऐतिहासिक पद्धत' असे म्हणतात. या पद्धतीचा अवलंब प्रथम 'इंडो-आर्यन' भाषेच्या बाबतीत केला गेला. त्यावरून असा निष्कर्ष निघाला की या 'भाषांची जननी एखादी भाषा ख्रिस्तपूर्व काळात उपलब्ध असावी व त्या भाषांचा एकच वंश असावा.'

या ऐतिहासिक अभ्यास पद्धतीच्या साहाय्याने अनेक कार्ये सुलभ झाली असली तरी त्यात काही वैगुण्येही होतीच. जो समाज ती भाषा बोलतो त्या समाजघटकांचा विचार या पद्धतीत केला जात नाही. तसेच भाषा ही समाजाचे प्रतिबिंब आहे, हे या ऐतिहासिक पद्धतीला मान्य असले तरी सामाजिक घटकांचा विचार किंवा त्यासंबंधीचे विवेचन या पद्धतीत केले गेले नाही.

2) तौलनिक भाषाभ्यास पद्धती :- एका भाषेच्या भिन्न-भिन्न काळातील स्वरूपे अथवा अनेक भाषांची स्वरूपे यांची परस्पर तुलना करणाऱ्या पद्धतीस 'तौलनिक भाषाभ्यास पद्धत' असे म्हणतात. दोन किंवा दोनपेक्षा अधिक कालखंडांतील भाषेच्या स्वरूपांचा विचार यात करतात म्हणून या पद्धतीला 'द्विकालिक' किंवा अनेककालिक पद्धत' असे ही म्हणतात; तसेच यात काळाच्या घटनेबाबत काळाच्या गतीचा संबंध येतो म्हणून या पद्धतीस 'गतिमान पद्धती' असेही संबोधण्यात येते.

भाषा ही सतत बदलत जाणारी संस्था असून तिचा प्रवाह हा एखाद्या सरितेच्या प्रवाहासारखा असतो. पाण्याला ज्याप्रमाणेच मागचा व पुढचा प्रवाहाचा भाग असतो त्याप्रमाणे भाषेची अवस्था असते. १९ व्या शतकाच्या आरंभी भाषेच्या शास्त्रज्ञांनी त्यांच्या अभ्यासासाठी या पद्धतीचा अवलंब केला. या पद्धतीने, सर्वात महत्त्वाचे विशेष म्हणजे तिच्या मदतीने केलेला अभ्यास आणि संशोधन हे आजवर बरेच फलदायी, यशस्वी झाले आहेत. परंतु यातही काही वैगुण्ये होतीच. या पद्धतीतही ऐतिहासिक पद्धतीप्रमाणेच

[illegible]
असणारा त्यांचा परस्परसंबंध या सर्व गोष्टींची चर्चा यात अभिप्रेत आहे; परंतु असे असूनही ती भाषा बोलणाऱ्या समाजघटकांचा विचार या पद्धतीत केला जात नाही.

या वर्णनात्मक पद्धतीत भाषेच्या निरनिराळ्या घटकांपैकी प्रत्येक घटकाचा सांगोपांग विचार होतो. वर्ण प्रक्रियेची एक, शब्द प्रक्रियेची दुसरी, प्रयोग प्रक्रियेची तिसरी अशा वेगवेगळ्या राशी तयार होतात. अशा राशी तयार झाल्या तरी त्यावरून भाषेच्या एकसमयावच्छेदेकरून अभ्यास होत नाही.

3) सार्वकालीन व सर्वविस्तारात्मक अभ्यास पद्धती:-
या पद्धतीत भाषेच्या इतिहाससंबंधीचा विचार केला जातो. ही पद्धत प्रथम जे. होरसन या भाषाशास्त्रज्ञाने सुरू केली. भाषेच्या सर्व अवस्थांतील महत्त्वाच्या गोष्टी म्हणजेच भाषेतील ध्वनी व त्या ध्वनीत होणारे बदल, शब्दसिद्धीत होणारे बदल; या सर्वांची कारणे तसेच शब्दार्थ, व्याकरण, शैली इत्यादी महत्त्वाच्या गोष्टींची एकत्रित मांडणी व त्या गोष्टींचे विवेचन करणे म्हणजेच त्या भाषेच्या इतिहासाचा विचार होय.

व्यक्ती व विषय ज्याप्रमाणे बदलतात त्याचप्रमाणे शैलीही बदलत असते. शैली, व्याकरण, शब्द या भाषाशास्त्राच्या वेगवेगळ्या अंगांचा अभ्यास तर फलदायी ठरतोच; पण ध्वनी प्रक्रिया व शब्द सिद्धी-या ही नेहमीच नीरस समजली जाणारी अंगे सुद्धा महत्त्वाची असतात. या होरसनच्या पद्धतीने फलित होणाऱ्या भाषाशास्त्रात 'सार्वकालीन व सर्वविस्तारात्मक भाषाभ्यास पद्धती' असे म्हणतात.

4) रचनात्मक अभ्यास पद्धती:- ही पद्धती म्हणजे भाषेच्या जडणघडणीसंबंधी अथवा रचनेसंबंधी एक अभिनव अशी विचारसरणी आहे. ही पद्धत वर्णनात्मक पद्धतीचाच एक भाग असून या पद्धतीने जे फलित झालेले भाषाशास्त्र त्यास 'रचनात्मक भाषाशास्त्र' असे म्हणतात. भाषेचे घटक हे शब्द, अर्थ, ध्वनी, वर्ण नसून या सर्व घटकांनी दाखविलेले परस्परसंबंध हेच मूळ घटक होत. बोलताना त्यांचे एकमेकांशी असणारे संबंध म्हणजे मुख्य घटक होत. प्रत्येक

भाषेची जडणघडण वेगवेगळी असते. म्हणूनच एक भाषा ही दुसरीपेक्षा वेगळी असते. या पद्धतीच्या अवलंबनाने भाषेचा विशिष्ट अर्थ त्याचा ठरतो. जेस्पर्सन यांनी या भाषाशास्त्रज्ञाने रचनात्मक पृथक्करणाने भाषेचा अभ्यास व संशोधन केले. या पद्धतीची काही तत्त्वे पुढीलप्रमाणे सांगता येतील.

1) भाषा ही सतत बदलते. 2) बदल होणे हा भाषेचा स्वभावच आहे. 3) बोली हेच भाषेचे शुद्ध स्वरूप आहे. 4) भाषेचे शुद्धत्व तिच्या वापरातील प्रयोगावरूनच ठरते. 5) भाषेचा वापर व्यक्तिसापेक्ष असतो.

वरील याच तत्त्वांतील काही तत्त्वे म्हणजे पहिली दोन तत्त्वे सर्वसामान्य आहेत व पुढील तीन अर्धसत्य आहेत, हे या पद्धतीचे वैगुण्य आहे. कारण बोलीतील स्वरूपच शुद्ध मानणे वस्तुस्थितीला धरून आहे. कारण आपणाला सुसंस्कृत समजावे म्हणून काही वेळेस बोलीतील शुद्ध स्वरूप टाकून ग्रंथातीलच भाषेचे स्वरूप वापरले जाते. तसेच व्याकरणातील व कोशातील शब्दरूपे शुद्ध नव्हेत, असे म्हणणे धाडसाचे होईल. कारण कोणत्यातरी काळी ती वापरात होतीच.

5) एककालिक वर्णनात्मक अभ्यास पद्धती :- एकाच कालातील भाषेचे स्वरूप या पद्धतीत अभ्यासले जात असल्यामुळे या पद्धतीस 'एककालिक पद्धती' असे म्हणतात. या पद्धतीमध्ये एकाच भाषेचे एकाच कालखंडातील प्रचलित रूढ असलेले स्वरूप अभ्यासासाठी निश्चित केले जाते व नंतर त्याचे संपूर्ण वर्णन केले जाते. ते रूप 'स्थिर' असते. म्हणून या पद्धतीस 'स्थितिमान किंवा स्थैर्यप्रधान पद्धती' असेही म्हणतात. या पद्धतीने जे भाषाशास्त्र फलित झाले त्याला 'वर्णनात्मक भाषाशास्त्र' असे म्हणतात.

या पद्धतीला विद्वानांची मान्यता अलीकडेच प्राप्त झाली असून त्याचा उपयोग अलीकडील काळातच

सुरु झाला आहे. अमेरिकन सैनिकांना परप्रांतातील भाषिक अडचणी निर्माण झाल्यामुळे अमेरिकन सैनिकांना परप्रांतातील भाषिक अडचणी निर्माण झाल्यामुळे या पध्दतीस चालना मिळाली. या पध्दतीचे लिओनार्ड ब्लूमफील्ड यांच्या Language (1933) या ग्रंथात काही सिध्दान्त सांगितले आहेत. ते पुढीलप्रमाणे :

क] भाषेचा संबंध विचाराच्या नियमांशी नसून मानवाने ठरविलेल्या व मानलेल्या संकेतांशी आहे ती मानवी संकेतावर आधारलेली आहे ; पण भाषा जेव्हा मात्र बोली असलेले लोक बोलतात तेव्हा त्यात काय-काय घडते याची नोंद करावयास हवी.

ख] एखादया प्रमाणभूत मानलेल्या भाषेच्या स्वरूपाला लक्षेच नव्हे तर तिच्या स्वत:च्या गतकालीन स्वरूपालाही अनुलक्षून त्या भाषेचे स्वरूप वर्णन करता येत नाही.

ग] भाषेत बदल होणे या भाषेच्या स्वभावामुळे तिच्यासंबंधी कसलाही नियम वेळेपुरताच लागू होतो.

घ] प्रत्यक्षात वापरात येणारे भाषेचे रूपच शुध्दरूप असते.

- या पध्दतीला व्यवहार महत्व मिळत आहे. ज्ञान, घटना व समाजघटना या समकक्ष असल्याने समाजाची प्रतिकृती म्हणूनच भाषेचा अभ्यास व्हाला पाहिजे ही नवी दृष्टी या पध्दतीनेच प्राप्त झाली. या पध्दतीत एककालिक स्वरूपातील ध्वनी, व्याकरण, कोश इ. प्रत्येक गोष्टीच्या स्वतंत्र अभ्यासाबरोबरच परस्परसंबंधाचाही अभ्यास होतो.

जेल्मस्लेव्ह या भाषाशास्त्रज्ञाने Glossemetic या नावाची एक पध्दती सुरू केली याचे त्याने पुढील पाच विशेष दिले आहेत.

Page No.
Date

1) भाषा ही विषय प्रकटीकरण अथवा ध्वन्यात्मक आविष्काराने बनली आहे.
2) भाषा ही विषयाची मांडणी ध्वनिचिन्हे क्रमवार मांडून करते.
3) विषयाचा ध्वन्यात्मक आविष्कार हे परस्परसंबंध असतात.
4) ध्वनीचा क्रम, त्यांची मांडणी या अंतर्गत निश्चित संबंध असतात.
5) ध्वनीच्या अर्थहीन खुणांना विषयाच्या अनुषंगाने अर्थ मिळतो.

या पद्धतीत काही आधारभूत तत्वे मानली आहेत; परंतु त्यातील काही तत्वे अर्धसत्य आहेत; तर काही सर्वसामान्य होय; तसेच सर्व पद्धतींच्या मुळाशी वर्णनात्मक पद्धती आहे. इतर पद्धती या भिन्न-भिन्न असल्या तरी त्या परस्परांशी संबंधित आहेत. या पद्धती शिवाय दुसरी पद्धत पूर्ण किंवा शक्यच होत नाही. भाषेच्या सर्व अवस्थांचा अभ्यास हा एककालिक पद्धतीवरच अवलंबून आहे. या पद्धतीच्या मदतीने भाषेची जडणघडण स्पष्ट करता येते. अशा वेळेस या एककालिक अथवा वर्णनात्मक पद्धतीसच महत्व प्राप्त होते. म्हणून ही पद्धत इतर सर्व पद्धतींच्या मुळाशी आहे. तसेच या पद्धतीत स्वन, स्वनिम, पदिम व्यवस्था, शब्दव्यवस्था, व्याकरण व्यवस्था इत्यादींचा अभ्यास होतो. या सर्व घटकांच्या रीतसर अभ्यास करून त्यांचे शास्त्रीय वर्णन देणे हे या पद्धतीचे प्रमुख कार्य होय.

SEE YOU AT THE FINISH LINE



हिन्दी पुस्तक
[illegible]

cello
Disney · PIXAR Cars
©Disney/Pixar

## 1) भाषिक परिवर्तनाचे स्वरूप

भाषा, समाज आणि संस्कृती यांचे एकमेकांशी अनुसंधान, सहकार्य आणि परावलंबित्व आढळून येते. यामुळेच समाज आणि संस्कृती यांचा विचार डावलून भाषेचा इतिहास लिहिता येत नाही. इतकेच नव्हे तर भाषेच्या संरचनेचे वर्णन किंवा तिच्या घटकांचे विश्लेषण करूनही भाषिक परिवर्तन का व कसे होते याचे आकलन होते असेही नाही त्यासाठी मनोविज्ञान, मानव विज्ञान इ. ज्ञानशाखांकडे वळून बौद्धिक मानसिक सामाजिक संस्कृतीव आनुवंशिक कारणांचा विचार करावा.

ऐतिहासिक भाषाविज्ञानात एखादी भाषा विशिष्ट कालखंडातून कशी परिवर्तित होत गेली याचे अध्ययन होतेच शिवाय एकंदरीत भाषिक परिवर्तनाचे स्वरूप काय असावे याचा विचार होतो. या संदर्भात विश्वातील हजारो भाषांच्या व बोलींच्या ऐतिहासिक परिवर्तनामागे असलेल्या सार्वत्रिक तत्वांचा शोध घेतला गेला आणि त्यानुसार भाषिक परिवर्तनाची उपपत्ती मांडली गेली. एकोणिसाव्या शतकात आणि विसाव्या शतकाच्या सुरुवातीस भाषांचा ऐतिहासिक दृष्टिकोनातून सखोल आणि विस्तृत अभ्यास झाला. त्यातून भाषिक परिवर्तनाचे आकलन करून घेण्याचे प्रयत्न होत राहिले.

ऐतिहासिक भाषाविज्ञान हे दोन्ही गृहीतकांवर आधारलेले आहे ते पुढीलप्रमाणे होय.

अ) सर्व मानवी समाज नामक विशिष्ट प्रकारची संप्रेषण पद्धती कालांतराने परिवर्तित होत जाते.

ब) ही भाषा नामक संप्रेषण पद्धती कालांतराने परिवर्तित होत जाते.

पहिले गृहीतक हे स्वयंसिद्ध आधार तत्वाप्रमाणे आहे. उपलब्ध अशा ऐतिहासिक पुराव्यावरून असे आढळून येते की जगातील सर्व मानव समाज कोणती ना कोणती तरी भाषा वापरत आला आहे किंबहुना असे सिद्ध करण्यात आले आहे की भाषा ही मानवाची मूलभूत गरज आहे.

दुसरे गृहीतक हे सामान्य अनुभवावर, निरीक्षणावर आधारलेले

आहे. एकाच भाषेच्या दोन किंवा अधिक कालखंडातील अभिलेखाची तुलना केली असता त्यात भिन्नता आढळते ही भिन्नता त्या भाषेच्या विविध कालखंडाच्या दरम्यानच्या परिवर्तनाची निदर्शक मानली जाते.

भाषिक परिवर्तन हे दोन अक्षांवर आधारलेले असते. एक अक्ष काळाचा आणि दुसरा संरचनेचा होय. एखाद्या काळात भाषा स्थिर राहिली आहे. असे कधीही होत नाही कालांतराने भाषा आपल्या पूर्व अवस्थेत पोहोचलेली आहे असे कधी होत नाही परिवर्तनामुळे निर्माण झालेल्या दोन अगर अधिक बोलींचा रोखही परस्परापासून भिन्न होण्याकडेच असतो. एखाद्या कालखंडात दुरावलेल्या दोन्ही बोली पूर्ण एकसारख्या झाल्या आहेत असे कदापिही घडत नाही एखाद्या समाजाने आपल्या बोलीचा त्याग करून अन्य बोलीचा स्वीकार करणे हे मात्र शक्य आहे.

काही भाषा शुद्धीवादी विद्वान, व्याकरण व कोशकार भाषेचे परिवर्तन थोपविण्याचा प्रयत्न करतात. फारशीचे मराठीवरील आक्रमण थोपविण्यासाठी शिवाजी महाराजांनी राज्यव्यवहार कोश बनवून घेतला परंतु फारशी भाषेचा वरचष्मा वाढत गेला. त्यानंतरही मराठीवरील इंग्रजी व फारशीचे आक्रमण थोपविण्याचे प्रयत्न सावरकर, माधवराव पटवर्धन इत्यादी केले परंतु त्यांनाही यामध्ये अतिशय मर्यादित यश प्राप्त झालेले दिसते. प्राचीन काळात पाणिनीनेही संस्कृत भाषेला आपल्या अष्टाध्यायीने नियमित करूनसुद्धा प्राकृत अनेक आधुनिक आर्य भारतीय भाषांमध्ये परिवर्तन झाले.

दोन बोलीतील साम्य हे केंद्रीकरण आदान-प्रदान समांतर विकास व योगायोग अशा अनेक कारणांनी उपस्थित होऊ शकते भाषिक परिवर्तन ही अतिशय गुंतागुंतीची बाब आहे. विविध कालखंडांतील विविध प्रकारच्या पुराव्यांच्या आधारे या परिवर्तनाचे सूत्र पकडून भाषेचा सुसंगत इतिहास उलगडत जाणारी ही एक जटिल, गुंतागुंतीची व अवघड प्रक्रिया ठरत असल्याचे दिसून येते.